# गोंवडी पोलीस स्टेशन, मुंबई

## एचडीएफसी अर्गो हेल्थ पॉलीसीच्या नावाने ऑनलाईन फसवणूक करणा-या बनावट तीन कॉल सेंटरचा पर्दापाश १२ आरोपी व १७ लाख रूपयेचा मुददेमाल हस्तगत

फिर्यादी यांनी दिनांक २२/०६/२०२६ रोजी फिर्याद दिली कि, त्यांना एचडीएफसी इर्गो हेल्थ पॉलीसी ऑफीसमधून बोलत असल्याचे भासवून त्यांचे पॉलीसवरील १,५३,८२५ रू चा नो क्लेम बोनस चा फायदा मिळविण्यासाठी प्रोसेस करावी लागेल असे खोटे बोलून फिर्यादी यांचे क्रेडीट कार्ड ची डिटेल्स विचारून घेत वेगवेगळे कारणे देत त्यांचे क्रेडीट कार्डवरून एकूण ३,४३,७००/- रू ची ऑनलाईन फसवणूक केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरून गोवंडी पोलीस स्टेशनला गु.रजि.नं. ४८९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१९(२) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(सी), ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गोवंडी पोलीस स्टेशनचे सायबर पथकाने तांत्रीक विष्लेषण करून मिळालेल्या माहितीच्या आधारे एम.के.रिक्रूटमेंट मॅन पॉवर, गाळा क्र जी-८४, कोहीनूर सिटी मॉल, कुर्ला पश्चिम या ठिकाणी असे बनावट कॉल सेंटर चालविले जात असल्यबाबत निष्पण्ण झाल्याने पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. सदर ठिकाणी बनावट कॉल सेंटर चालविण्यासाठी लागणारे कॉम्प्युटर, लॅपटॉप, राउटर, मोबाईल फोन, वेगवेगळया कंपनीचे सिमकार्ड, तसेच ग्राहकांना कसे बोलून क्रेडीट कार्डची माहिती देण्यास प्रवृत्त करायचे याची स्क्रिप्ट व हे काम करणारे एकूण ०६ आरोपीतांना ताब्यात घेतले. फसवणूक केलेल्या ग्राहकांच्या क्रेडीट कार्डवरून सोन्याचे सिक्के व वस्तू ऑनलाईन खरेदी करून पार्सल मागविले जात असे.

मा.पोलीस उपायुक्त पुर्व परिमंडळ - ०१ यांचे मार्गदर्शनानुसार वरील आरोपीतांना पोलीस कस्टडीत त्यांचेकडे सखोल व कौशल्यपूर्ण केलेल्या तपासा दरम्यान एचडीएफसी कंपनीच्या हेल्थ इन्शुरन्स घेतलेल्या ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी लागणारा हेल्थ इन्शुरन्स कंपणीचा डाटा, सिमकार्ड पुरविणारे तीन आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांना सखोल व कौशल्यर्पूवक विचारपूस केली असता त्यांनी दिलेल्या माहितीवरून आणखी ०२ कॉल सेंटर - साई लिलावती निवास गाळा, असल्फा व्हिलेज आणि कोहीनूर मॉल गाळा नं जी २२ या ठिकाणी त्या ठिकाणी गोवडी पोलीस स्टेशनच्या पथकाने छापा टाकून कॉल सेंटरचा सेट अप व आरोपीतांना ताब्यात घेतले. असे एकूण १२ आरोपी अटक करून त्यांचेकडून एकूण २९ कॉप्यूटर, ०५ लॅपटॉप, १५ मोबाईल, ०३ राउटर, १५ सिमकार्ड व फसवणूक करण्यासाठी लागणारी स्क्रिप्ट, ऑनलाईन खरेदी केलेले २८.०५ ग्रॅम सोने असे एकूण १७,१८,२००/- रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपीतांनी आशा प्रकारे परराज्यातील इन्शुरन्स ग्राहकांची सूध्दा फसवणूक केलेली असल्याचे निष्पण झाले असून अधिकची चौकशी चालू असुन अजुन आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, बृहन्मूंबई श्री देवन भारती, सह पोलीस आयुक्त मा. मनोजकुमार शर्मा, पूर्व प्रादेशिक अपर पोलीस आयुक्त मा.धनंजय कुलकर्णी, पोलीस उपायुक्त पूर्व परिमंडळ ०१ श्री समीर शेख, सहायक पोलीस आयूक्त श्री रामराव ढिकळे चेंबुर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली गोंवडी पोलीस स्टेशनचे वपोनि श्री पंढरीनाथ सांवत, पोलीस निरीक्षक हणमंत क्षिरसागर, दयानंद जाधव, पो उप निरीक्षक अजय गोल्हार, अजित कंक, राहूल करंकाळ, माळवे पो.ह. प्रकाश नागे,शंकर पवार, दशरथ राणे, संभाजी लोहेटे, पो.ह. विजय चव्हाण, पो.ह. सतीश साळुंखे, पो. शि. अरविंद माळवे, निलेश भोर, समीर रेवाळे, महेश बोडरे, सोमनाथ आठरे, मपोशि कल्याणी पाफळे या पथकाने केली.

मुंबई पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना अवाहन करण्यात येते कि, कोणत्याही अज्ञात व्यक्तीने इन्शुरन्स हेल्थ कंपणीमधून बोलत असल्याचे सांगून घेतलेली इन्शूरन्स पॉलीसी बंद करण्याची अगर त्यावरील परतावा मिळवून देण्याचे अमिष दाखवून आपली बॅंक डिटेल्स, कार्ड डिटेलस, ओटीपी मागितल्यास तो देवू नये. आशा प्रकारच्या सायबर फसवणूकीची शंका आल्यास तात्काळ शासकीय हेल्प लाईन १९३० वर कॉल करावा व त्वरीत जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा.